36

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक कार्य

प्रा. बोराडे तानाजी रामभाऊ
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

***********

## जीवन परिचय

महात्मा ज्योतिबा फुले हे महाराष्ट्रातील थोर क्रांतीकारकांपैकी एक होते. त्यांनी उच्च जातीच्या श्रेष्ठत्वा विरूद्ध लढा दिला व दलीत आणि स्त्रीयांच्या उन्नतीसाठी आपले संपूर्ण जीवन खर्ची केले. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्हयातील कटगुन या खेडयात माळी कुटुंबात झाला. जोतिबाचे मूळ आडनाव गोऱ्हे होते. हे कुटुंब पेशव्यांना फुले पुरवीत असे. त्यामुळे पुढे त्यांचे फुले हेच आडनाव पडले व याच नावाने समाजात त्यांची ओळख झाली. त्यांचे वडील गोविंदराव फुले हे भाजीपाल्याचा व्यापार करत. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर जोतिबांनी वडीलांना मदत करण्यास सुरूवात केली. प्रथेनुसार त्यांचा विवाह १२ व्या वर्षी सावित्रीशी झाला. एक मुस्लीम शिक्षक व खिस्ती सद्गृहस्थ हे दोघे जोतिबांचे शेजारी होते. त्यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी पुण्यातील एका स्कॉटीश शाळेत प्रवेश घेतला. खिस्ती मिशनाऱ्यांच्या प्रभावामुळे जोतिबांना शिक्षण, सा.सुधारणा व मानवतावाद याचे महत्व कळाले थॉमस पेन या विचारवंताच्या 'मानवांचे हक्क' (Rights of Man) या पुस्तकातील विचाराचा फार मोठा प्रभाव पडला. छत्रपती शिवाजी महाराज व जॉर्ज वॉशिग्टन यांच्या जीवन कार्यांनेही जोतिबा खुपच प्रभावीत झाले होते. ते हिंदु धर्माचे प्रखर टिकाकार होते. त्यांनी हिंदुच्या चातुर्वण्य व्यवस्थेवर जोरदार हल्ला चढविला त्यांनी वेदाला पूर्ण विरोध केला. विवाह तसेच धार्मिक विधीमध्ये पुरोहिताची जी भूमीका होती ती नाकारली. त्यांनी हिंदुच्या मनुस्मृती ग्रंथास पूर्ण विरोध केला. तसेच हिंदू धर्म ग्रंथावरही हल्ला चढविला. आपल्या हितसंबधास अनुकुल ठरतील अशाप्रकारे ब्राम्हणांनी धार्मिक ग्रंथ लिहिले आहेत असे त्यांचे मत होते. कनिष्ठ जातीचा दर्जा उंचावणे हा त्याचा उद्देश होता. हे उददिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

## सत्यशोधक समाज

सत्यशोधक समाजाकडे ब्राम्हणेत्तर चळवळ म्हणून बघितले जाते. उच्च जातीच्या कचाटयातुन कनिष्ठ जातीची सोडवणूक करण्यासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जाती ऐवजी गुणवत्तेवर भर देणे हे सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट होते या समाजाने अनेक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. या समाजाने स्त्रीया व कनिष्ठ जातीत शिक्षण प्रसाराचे मोठे कार्य केले. तसेच जातीव्यवस्थेवर हल्ला केला. या समाजाची तीन तत्वे होती. १. समता २. बंधुत्व ३. धार्मिक कार्यातील मध्यस्थांचे उच्चाटन करणे. व्यक्तीची जात व वंश विचारात न घेता सर्व लोकांना सत्यशोधक समाजात प्रवेश दिला. या समाजाच्या प्रत्येक सदस्यास ब्रिटीश सत्तेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागे कारण ब्रिटीश सरकारने भारतात आधुनिक शिक्षणाची सुरूवात केली होती आणि कनिष्ठ जातीना शिक्षणाची सुरूवात केली होती. भारतीयांनी स्थापन केलेल्या संघटनाकडे ब्रिटीश सरकार संशयाने पाहत असल्याने सत्यशोधक समाजात राजकीय विषयावर न चर्चा करण्याचे बंधन होते. फुलेंची ही संघटना राजकीय नसल्याने फुलेंना सरकारने लष्करातील फलटनीत व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले.

क्षूद्र व कनिष्ठ जातीवर ब्राम्हण, पुरोहित वर्गाने जी धार्मिक व मानसिक गुलामगिरी लादली होती त्यातुन त्यांची मुक्तता करणे ब्राम्हणाकडून होणारे शोषण थांबवणे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्दिष्ट होते. ब्राम्हणांनी आपल्या सोयीनुसार जी मक्तेदारी निर्माण केली होती त्यातुन ही सामाजिक विषमता निर्माण झाली आहे असे फुलेंना वाटत होते म्हणूनच त्यांनी हिंदू धर्म ब्राम्हण पुरोहित वर्ग मुर्तीपुजा, कर्मकांड

आणि हिंदू धर्मग्रंथ या सर्वावर प्रखर टिका केली. त्यांनी कोणत्याही एका देवावर किंवा धर्मावर श्रध्दा ठेवली नाही. त्यांनी इश्वरास 'निर्मिक' म्हटले आहे. हे विश्व ईश्वराने निर्माण केले असून सर्व धर्म व धर्मग्रंथ हे मानव निर्मीत आहेत. यावर त्यांचा दृढ विश्वास होता.

**सत्यशोधक समाजाची तत्वे**

१. ईश्वर एकच असून तो सर्व व्यापी निराकार, विश्वनिर्माता व सत्यरूप असून सर्व मानव ही त्याची लेकरे आहेत.

२. ईश्वराची भक्ती करण्याची हक्क सर्वांना असून त्यासाठी ब्राम्हण पुरोहिताची गरज नाही.

३. मनुष्य हा त्याच्या जातीने (जन्माने) श्रेष्ठ नसुन त्याच्या गुणामुळे श्रेष्ठ ठरतो.

४. धर्मग्रंथ ईश्वराने लिहीले नसल्यामुळे ते प्रमाण नाहीत.

५. पूर्नजन्म कर्मकांड, उपवास तापास, जप—जप, नवस करणे इ.गोष्टी आज्ञान मूलक आहेत.

**महात्मा फुलेंचे सामाजिक कार्य**

महात्मा फुलेंनी आपल्या सामाजिक कार्यात कनिष्ठ जातीची व स्त्रीयांची उन्नती घडवून आणणे यासाठी संपूर्ण जीवन या कार्यासाठी समर्पित केले. त्याकाळात बालविवाह, विधवा पुर्नविवाहास बंदी होती. अस्पृश्यता पालन, निरक्षरता, स्त्रीया व कनिष्ठ जातीचे शोषण इ.प्रथा—परंपरा समाजात होत्या. या सर्व अनिष्ठ प्रथा नष्ठ करण्याचा प्रमाणिक प्रयत्न आपल्या सामाजिक कार्यातुन फुलेंनी केलेला आहे.

**१. स्त्रीयांची उन्नती**

भारतीय समाज हा पुर्वीपासून ते आजपर्यत पितृसत्ताक स्वरूपाचा आहे त्यामुळे स्त्रीयानंतर पुरूषांच्या वर्चस्वाखाली आपले जीवन आजही व्यतीत करावे लागते. पुरूषापेक्षा त्यांचे स्थान दुय्यम मानले आहे म्हणूनच पारंपारिक भारतीय समाजात त्यांचे शोषण केले जाई. फुलेंनी बालविवाह, विधवा विवाह बंदी याला विरोध करून विधवा पुर्नविवाहाचा पुरस्कार केला. त्याकाळात विधवेला मूल झाले तर त्याची हत्या केली जाई. या हत्या रोखण्यासाठी महात्मा फुलेंनी अनाथालये सुरू केली व त्याठिकाणी या मुलांचे पालन—पोषण करू लागले. ते केवळ समतेचे नाही तर खऱ्या माणुसकीचे पुरस्कर्ते होते. त्यामुळेच त्यांनी स्त्रीयावरील अत्याचार कमी करण्यासाठी शिक्षणाची गरज व्यक्त केली व स्त्री शिक्षणास महत्व दिले व मुलांसाठी पुणे येथे भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि नंतर तीन शाळा सुरू केल्या व स्त्रीयांचा समाजातील दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला.

तत्कालीन सामाजिक जिवनात बालविवाहाची प्रथा प्रचलित होती तसेच विधवांच्या विवाहास मनाई होती. महात्मा फुल्यांनी विधवांना पुर्नविवाह करण्यास चालना दिली. फुलेंनी सभा, चर्चा, भाषणे या माध्यमातून पुर्नविवाहाचा पुरस्कार केला. स्त्रीयांचे लहानपणीच विवाह होत असे साहजीकच कुमारी विधवांची संख्या जास्त होती परिणामी हया तरूण विधवा समाजातील वाईट प्रवृत्तीच्या लोकांच्या वासनेस बळी पडत. गरोदर राहत समाजात आपली बदनामी होईल या भितीने त्या नवअर्भकाला कोठे तरी फेकुन देत. त्या जाचातून स्त्रियांची सुटका व्हावी यासाठी जोतीबा फुले यांनी बालहत्या प्रतिबंध ग्रहाची स्थापना इ.स.१८६३ मध्ये केली. या ठिकाणी गरोदर स्त्रियांनी येउन सुरक्षित पणे प्रसूत होउ लागल्या. अशा नव अर्भकाचे पालनपोषण हे बालहत्या प्रतिबंधकगृह करीत असे. विधवा स्त्रियांना फुले हे देवदूत वाटत. काशीबाई नावाची एक ब्राम्हण बालविधवा त्यांच्या बालहत्या प्रतिबंधक गृहात पसूत झाली होती. तिला मुलगा झाला. त्याला फुले दाम्पत्याने दत्तक घेतले व त्याचे नाव यशवंत ठेवले. तसेच तत्कालीन सामाजिक जिवनात विधवा स्त्रियांकडे पुरूषांचे लक्ष जाउ नये म्हणून केशवपणाची अमानुष प्रथा रूढ झाली होती. या अमानवी प्रथेचा त्यांनी कडाडून विरोध केला त्या निषेधार्थ नाव्हयांना विधवांचे केशवपण करू नये यासाठी त्यांनी नाव्ही समाजाचा संप घडवून आणला असे कार्य करीत असताना सनातनी लोकांनी महात्मा फुलेंना मोठया प्रमाणात विरोध केला तथापि त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले.

**२. अस्पृश्योध्दार—**

ज्योतिबांनी स्त्रियांसाठी व्यापक कार्य केले त्याच प्रमाणे त्यांनी अस्पृश्य समाजाला न्याय देण्याचे

कार्य केले. फुले एका मित्राच्या लग्नाच्या वरातीत सहभागी झाले होते. तेव्हा मित्राच्या नातेवाईकाने त्यांचा अपमान केला होता. त्यावेळेस त्यांनी जातीव्यवस्थेचे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा केली. कनिष्ठ जातीच भारतातील मूळचे रहिवासी असून ज्यांनी जातिव्यवस्था निर्माण केली ते आर्य हे परकिय होते असे त्यांचे ठाम मत होते. जातीव्यवस्थेची निर्मिती आर्यभटांनी स्वत:च्या स्वार्थासाठी निर्माण केलेली व्यवस्था असल्याचे फुले यांचे मत होते.

अस्पृश्य समाज हा शिक्षणाभमुख झाल्याशिवाय हया समाजातील गुलामगिरी व विषमता संपणार नाही. त्यांच्यासाठी उदनिर्वाहाचे मार्ग खुले केल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही म्हणून जोतीबांनी इ.स.१८५१ पुणे येथे वेताळपेठेत दाने शाळा स्थापन केल्या. त्यांनी अस्पृश्यात शिक्षणाची गोडी निर्माण केली. त्यांनी सनातनी लोकांनी विरोध केला. काहींनी त्यांच्यावर मारेकरीही घातले परंतु नंतर ते जोतिबांचे शिष्य बनले अस्पृश्य लोक शिकल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही, असे त्यांना वाटत होते. खऱ्या अर्थाने शेकडो वर्षे अज्ञानाच्या छायेत जीवन जगणाऱ्या समाजातील एका मोठ्या वर्गाला ज्ञानाचे दरवाजे उघडून देण्याचे महत्वाचे कार्य महात्मा जोतिरावांनी केले. त्याच बरोबर त्यांनी सत्यशोधक समाज या संघटनेत अस्पृश्यांसह सर्वांना प्रवेश दिला. अस्पृश्य समाजाला उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची समस्या प्रकर्षाने जाणवत असे. साहजिकच त्यांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत असत. हे विचारात घेउन महात्मा फुले यांनी इ.स. १८६२ साली आपल्या घरातील पाण्याचा खाजगी हौद अस्पृश्यांसाठी पाणी भरण्यासाठी खुला करून दिला. खऱ्या अर्थाने ही सामाजिक क्रांती होती.

**३. धर्मविषयक कार्ये:**

हिंदू धर्मात प्रचलित असलेल्या वेगवेगळया प्रथा, परंपरा वाईट चालिरिती विरूध्द त्यांनी आवाज उठवला तसेच त्याला विरोध केला. सर्व माणसे एकाच धर्मग्रंथाच्या नावाखाली शुद्रातिशुद्रांना धार्मिक वृत्तीच्या मंडळींनी सामाजिक गुलामगिरीत बांधुन टाकण्याचे काम केले होते. त्यांनी याबाबत स्वत: कृती करून समाजाला अनुकरण करावयास सांगितले. धार्मिक परिवर्तनाच्या बाबतीत ते पहिले कृतीवीर ठरले. ब्राम्हणाच्या धार्मिक मक्तेदारीला त्यांनी आव्हान देउन तत्कालीन समाजातील वर्णव्यवस्थेला विरोध केला.

**४. शेतकऱ्याविषयीचे कार्ये:**

शेतकरी हाच देशाचा पोशिंदा आहे असे जोतिबा फुले यांचे मत होते. फुलेंनी शेतकऱ्यांच्या उध्दारासाठी अत्यंत व्यापक कार्य केले. शेतकऱ्यांच्या आसूड या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या वेगवेगळया समस्यावर प्रकाश टाकला. सावरकराची मक्तेदारी नष्ट करण्यासाठी इ.स.१८७५ मध्ये चळवळ सुरू केली. सरकारने धरणे, कालवे बांधून शेतीला पाणी द्यावे. शेतकऱ्यांना सावरकराच्या कर्जातुन मुक्त करावे. त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय करावी. शेतकऱ्यांना शेती उपयोगी बी, बीयाणे, अवजारे पुरवावी चांगली शेती करणाऱ्या शेतकऱ्यास बक्षिस द्यावे.

पुण्यात महाराणी व्हिक्टोरीयाचा मुलगा डयूक ऑल कॅनॉट यांचा सत्कार आयोजित केला होता त्या सत्कारावेळी समारंभास समाजातील संस्थानिक, इनामदार, अधिकारी, सरदार इ.लोक उपस्थित होते त्यात महात्मा फुले सध्या शेतकऱ्याच्या वेशात या समारंभाला गेले व देशातील बहुसंख्य गरीब शेतकऱ्यांची हालाखीची परिस्थिती राजपुत्रासमोर सादर केली. ते त्यांच्या भाषणात म्हणतात, ''आपल्या समोर रेश्मी कपडे नि अलंकार परिधान केलेले श्रीमंत सरदार नि जहागिरदार पाहून रयते विषयी आपण मत बनवू नये खरा हिंदूस्थान पहावयाचा असेल तर मजबरोबर खेडयात चला. खरा हिंदूस्थान खेडयात आहे. तेथील जनता निर्धन, भूखी कंगाल व बेघर आहे. महाराणींना सांगा की, गरीब जनता दरिद्रियात पिचत असून त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे.''

**५. कामगार चळवळ:**

फुले कंत्राटदाराचा व्यवसाय करीत होते. साहजिकच त्यांना मजूरांच्या समस्येची जाणीव होती. त्यांनी मजूरांचे शोषण करण्यावर कडक शब्दात टिका केली. त्यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत गिरणी कामगारांची पहिलीच चळवळ होती. त्यांच्या कार्यामुळे सरकारला मजूरांच्या समस्येकडे लक्ष देणे भाग पडले. कामगारांवर होणारा अन्याय व शोषण यावर आवाज उठविण्यासाठी

त्यांनी 'दिनबंधु' नावाचे साप्ताहिक सुरू केले. नारायण मेघाजी लोखंडे हे या साप्ताहिकाचे संपादक होते.

**६. मद्यपानास विरोध:**

पुण्यातील मद्यपान गृहात वाढ थोरणाला विरोध करणारे पत्र जोतिबा फुले यांनी पुणे महानगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षाला १८ जुलै १८८० रोजी लिहले. पुणे शहरात भर मध्यभागी दारू विक्री केल्यामुळे लोकांच्या नैतिक अध:पतनाची बीज रोपण होत आहे. त्यामुळे शरीरावर त्याचा परिणाम होत आहे. अनेक कुटुंबाची वाताहात होत आहे. हे स्पष्ट करून नगर पालिकेने या दारूच्या दूकानावर ज्या प्रमाणात हानी करतात. त्या प्रमाणात कर बसवावा असे म्हटले होते. मद्य वर्ज्य करून तोच पैसा ग्रंथखरेदीत गुंतवा असे आवाहनही त्यांनी केले होते.

**समारोप**

अशा प्रकारे महात्मा फुले यांनी आपल्या विचार व कृती यातून तत्कालीन सामाजिक जिवनातील स्त्रियांना सामाजिक, धार्मिक गुलामगिरीतून बाहेर येण्यासाठी व त्यांच्यात आपल्या हक्कांची जाणीव निर्माण करण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून न्याय व समानता मिळवून देण्याचे महान कार्य केले तसेच अस्पृश्य शेतकरी कामगार वर्गाला देखील त्यांच्या जीवनात अमुलाग्र असे परिवर्तन केले.

**संदर्भग्रंथ**

१. महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, प्राचार्य अण्णासाहेब गरूड/प्राचार्य बी.बी.सावंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद प्रकाशन १९९५

२. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८–१९६०), प्राचार्य एस.एस.गाठाळ, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, जुलै २०१३

३. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, डॉ.आर. एस.कोंडेकर, डॉ.एन.जी.भर्दे, प्रा.साईनाथ शेटोड चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद जून २०११

❑❑❑



S.P. Mahavidyalaya Bhoom Ta Bhoom Dist
PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad